# भारतातील स्त्री-पुरुष प्रमाणाचा राज्यनिहाय तुलनात्मक अभ्यास

**प्रा.डॉ. रामनाथ बाबुराव सांगुळे**
सहाय्यक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग,
अंकुशराव टोपे महाविद्यालय, जालना

**प्रस्तावना:**

भारताची संस्कृती ही जगातील प्राचीन संस्कृतीपेक्षा एक आहे. प्राचीन भारतात ऐतिहासिक काळापासून पुरुषप्रधान कुटूंब पध्दती असूनही स्त्रीयांना मिळालेला मान सन्मान हा विचारात घेण्यासारखा होता. 'यत्र नार्यस्तु पुज्यते, रमते तत्र देवता' याचा अर्थ आदर्श संस्कृतीनुसार जिथे स्त्रियांना मान सन्मान केला जातो, तेथे देवता वास करतात. स्त्री आणि पुरुष ही समाज रथाची दोन चाके आहेत. सदृढ, निरोगी समाजाच्या जडणघडणीसाठी स्त्री पुरुष प्रमाणाचा समतोल नैसर्गिकरित्या राखणे आवश्यक आहे.

आजच्या विज्ञान युगात देशाने सर्वच क्षेत्रामध्ये प्रगती केलेली आहे. मात्र आजच्या युगात पुर्वीच्या काळापेक्षा भयावह चित्र समाजात निर्माण झालेले दिसत आहे. ते असे की आज विज्ञानामुळे स्त्रिला (मुलीला) जन्मालाच येऊ दिले जात नाही. यामुळे स्त्री-पुरुष प्रमाणाचा असमतोल ही आधुनिक काळातील गंभीर समस्या बनलेली आहे. यातही गर्भनिदान सारख्या तंत्राच्या गैरवापरामुळे ही समस्या दिवसेंदिवस बिकट होत आहे. समाजात एकीकडे स्त्री-पुरुष समानतेचा डांगोरा पिटायचा आणि दुसरीकडे गर्भातच मुलीची हत्या करायची अशा दुटप्पी मानसिकतेमुळे मानवी जीवनाचा समतोल बिघडत चालला आहे. हे टाळण्यासाठी शासकिय आणि निमशासकिय सतरावर विविध योजनांच्या माध्यमातून समाजव्यवस्था सुरळीत चालविण्यासाठी स्त्री-पुरुष प्रमाणाचा समतोल ठेवणे आवश्यक आहे.

मुलीच्या जन्माचे स्वागत म्हणजे मुलाच्या जन्माचा विरोध असे अजिबात नाही. पण सामाजिक समतेसाठी, सामाजिक स्वास्थ्यासाठी स्त्री आणि पुरुषांची संख्या समान असावी, सामाजिक, आर्थिक आणि कौटुंबिक विकासात स्त्रियांना समान स्थान असणे समान अधिकार तिला प्रदान करणे आवश्यक आहे. अशाच पध्दतीने प्रस्तुत शोधनिबंधात भारतातील लिंग-गुणोत्तर, साक्षरता आदिंच्या बाबतीत स्त्रीयांचा अभ्यास करण्यात आला आहे.

**उद्दिष्टे:-**

१. भारतातील स्त्री-पुरुष प्रमाणाचा अभ्यास करणे.
२. शुन्य ते सहा वयोगटातील मुला-मुलींचे प्रमाण अभ्यासणे.
३. लिंग निहाय साक्षरतेच्या स्थितीचा अभ्यास करणे.

**गृहितके:-**

१. भारतातील लिंग गुणोत्तराच्या प्रमाणात असमतोल निर्माण होत आहे.
२. राज्य निहाय स्त्री-पुरुष साक्षरतेत तफावत आहे.

**संशोधन पध्दती:-**

संबंधित विषयाला न्याय देण्याच्या अनुषंगाने विषयाला अनुसरुन यथार्थ तथ्य संकलित करण्यासाठी प्रामुख्याने दुय्यम साधनांचा वापर केलेला आहे. यामध्ये विविध मासिके, साप्ताहिके, शासकिय सांख्यकीय आकडेवारी, इंटरनेट व विषयाशी संबंधित पुस्तके यांचा अवलंब केलेला आहे आणि दुय्यम माहितीच्या सादरीकरणासाठी विश्लेषणात्मक पध्दतीचा अवलंब करण्यात आला आहे.

तक्ता क्र.१

**भारतातील स्त्री-पुरुष प्रमाण (वर्ष २००१ व २०११)**

| राज्य/देश | २००१ | २०११ |
|---|---|---|
| भारत | ९३३ | ९४० |
| केरळ | १०५८ | १०८४ |
| पाण्डेचरी | १००१ | १०३८ |
| चंदीगड | ७७७ | ८१८ |
| दीव-दमण | ७१० | ६१८ |
| दादरनगर हवेली | ८१२ | ७७५ |
| महाराष्ट्र | ९२२ | ९२५ |

स्त्रोत: लोकराज्य सप्टेंबर २०११ पृष्ठ क्रमांक २१

तक्ता क्रमांक १ मध्ये भारतातील स्त्री-पुरुष प्रमाणाचा २००१ व २०११ च्या जनगणनेनुसार उपलब्ध आकडेवारीचा अभ्यास केला आहे. सन २०११ मध्ये भारतातील स्त्री-पुरुष प्रमाण ९३३ होते त्यामध्ये सन २०११ मध्ये ९४० एवढीच वाढ झाली आहे. सन २०११ मध्ये केरळ आणि पांण्डेचरी या राज्यांचे स्त्री-पुरुष प्रमाण अनुक्रमे १०५८ आणि १००१ होते. वरील राज्यांनी आपल्या प्रमाणात २०११ मध्ये मोठ्या प्रमाणात प्रगती केली, हे प्रमाण अनुक्रमे १०८४ व १०३८ पर्यंत वाढले आहे. वरील दोन राज्यांचे स्त्री-पुरुष प्रमाण हे देशामध्ये सर्वाधिक असल्याचे दिसते.

तक्ता क्र. १ वरुन सन २००१ मध्ये सर्वात कमी स्त्री-पुरुष प्रमाण असणारे राज्य चंदीगड व दमणदीव होती, ज्यांचे प्रमाण दर हजार पुरुषामागे ७१० एवढे कमी होते. त्यामध्ये सन २०११ मध्ये चंदीगड या राज्याने ७७७ वरुन ८१८ एवढी वाढ केली आहे तर दमण दिव राज्याने ७१० वरुन ६१८ एवढी प्रचंड घट स्त्री-पुरुष प्रमाणात केली आहे.त्याचप्रमाणे दादर नगर हवेली राज्य हे २००१ मध्ये कमी स्त्री-पुरुष प्रमाण असणारे तिसऱ्या क्रमांकाचे राज्य होते, ते २०११ मध्ये दुसऱ्या क्रमांकावर गेले आहे. दादर नगर हवेली राज्याच्या स्त्री-पुरुष प्रमाणात ८१२ वरुन ७७५ एवढी घट २०११ मध्ये झाली आहे.एकंदर देशाच्या आणि जास्तीत जास्त व कमीत कमी स्त्री-पुरुष प्रमाण असणाऱ्या राज्यांचा विचार केला असता महाराष्ट्रासारख्या राज्याचे स्थान देखील सरासरी पेक्षा कमी आहे. सन २००१ मध्ये महाराष्ट्रातील स्त्री-पुरुष प्रमाण ९२२ होते. त्यामध्ये २०११ मध्ये ९२५ एवढी वाढ झाली परंतु इतर राज्यांच्या तुलनेत आणि देशाच्या सरासरीच्या तुलनेत महाराष्ट्राचे स्थान खालचे आहे.त्यामुळे स्त्री-पुरुष प्रमाण कमी आहे.

तक्ता क्र.२

**शुन्य ते सहा वयोगटातील मुला-मुलींचे प्रमाण**

| राज्य/देश | २००१ | २०११ |
|---|---|---|
| भारत | ९२७ | ९१४ |
| दादर नगर हवेली | ९७९ | ९२४ |
| छत्तीसगड | ९७५ | ९६४ |
| मिझोराम | ९६४ | ९७१ |
| मेघालय | ९७३ | ९७० |
| पंजाब | ७९८ | ८४६ |
| हरियाना | ८१९ | ८३० |
| महाराष्ट्र | ९१३ | ८८३ |

स्त्रोत: लोकराज्य सप्टेंबर २०११ पृष्ठ क्रमांक २०

देशातील मुला-मुलींच्या सन २००१ ते २०११ या दरम्यानच्या प्रमाणाचा अभ्यास करीत असतांना असे दिसून आले की, देशात २००१ मध्ये हे प्रमाण ९२७ होते ते २०११ मध्ये ९१४ झालेले आहे. म्हणजेच देश २१ व्या शतकाकडे वाटचाल करीत असतांना मुलांपेक्षा मुलींच्या प्रमाणात घट होणे हे अत्यंत भयावह चित्र आपणास पहावयास मिळत आहे. देशातील काही राज्यांचा अभ्यास करीत असतांना प्रामुख्याने दादर नगर हवेली व छत्तीसगड या राज्यांचे २००१ मध्ये प्रमाण अनुक्रमे ९७९ व ९७५ होते. सन २०११ मध्ये ह्या प्रमाणात घट होऊन हे अनुक्रमे ९२४ व ९६४ असे झाले याचा अर्थ असा होतो की, दिवसेंदिचस राज्यातील मुलींच्या प्रमाणात पुर्वीपेक्षा घट दिसून येत आहे.

हरियाणा आणि महाराष्ट्र या राज्यांचा अभ्यास करीत असतांना असे दिसून येते की, २००१ मध्ये देशातील मिझोराम व मेघालय या राज्यांमध्ये स्त्री-पुरुष प्रमाण अनुक्रमे ९६४ व ९७३ असे होते हेच प्रमाण २०११ मध्ये प्रामुख्याने ९७१ व ९७० असे झालेले दिसून येते. याचा अर्थ असा की, इतर राज्यांच्या तुलनेत या राज्यांनी प्रगती केलेली असली तरीही दादर व नगर हवेली आणि छत्तीसगड या राज्यातील २००१ मधील प्रमाणाच्या तुलनेत घटच झालेली दिसून येते. देशातील आर्थिकदृष्ट्या प्रगतशिल म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पंजाब, हरियाणा या राज्यांचा अभ्यास करीत असतांना सन २००१ मध्ये ७९८ व ८१९ असे प्रमाण होते, त्यात सन २०११ मध्ये वाढ होवून ८४६ व ८३० असे झाले आहे. असे जरी असले तरी देखील १००० मुलामागे मुलींचे प्रमाण १५४ व १७० एवढे वाढले म्हणजेच दिवसेंदिवस या प्रमाणात देखील सरासरीच्या तुलनेत घट झाली आहे. याचा अर्थ असा की, प्रगतशिल राज्यांचा स्त्रिया अथवा मुलीकडे पाहण्याचा दृष्टीकोन आजच्या काळातही दुय्यमच असलेला दिसून येतो.याचप्रमाणे महाराष्ट्र राज्यातील मुला-मुलीच्या प्रमाणाचा आढावा घेताना सन २००१ मध्ये ९१३ असे मुलीचे प्रमाण होते यामध्ये सन २०११ मध्ये वाढ होण्याऐवजी घट होवून हे प्रमाण घटले आहे.एकूण सरासरीचा विचार केला असता १००० मुलामागे मुलीचे प्रमाण ११७ ने कमी आहे.

थोडक्यात एकीकडे वरील विवेचनावरुन असे लक्षात येते की, एकीकडे देशाचा विकास होत आहे मात्र दुसरीकडे विकासात मुला-मुलींच्या प्रमाणात दरी निर्माण होत आहे, याकडे गांभार्याने लक्ष देणे आवश्यक आहे.

तक्ता क्र.३

**राज्यनिहाय साक्षरता प्रमाण (२००१ ते २०११)**

| राज्य | २००१ | | | २०११ | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | एकूण | पुरुष | स्त्री | एकूण | पुरुष | स्त्री |
| भारत | ६४.८४ | ७५.६७ | ५३.६७ | ७०.०४ | ८२.१४ | ६५.४६ |
| केरळ | ९०.८६ | ९४.२४ | ८७.९२ | ९३.९० | ९६.०० | ९२.३० |
| मिझोराम | ८८.८० | ९०.९२ | ८६.७५ | ९१.६० | ९३.७० | ८९.४० |
| बिहार | ४७.०० | ५९.६८ | ३३.१२ | ६३.८० | ७३.५० | ५३.३० |
| झारखंड | ५३.५६ | ६७.३० | ३८.८७ | ६७.०० | ७३.०७ | ५९.०६ |
| महाराष्ट्र | ७६.८८ | ८५.९७ | ६७.०३ | ८२.९० | ८९.८० | ७५.८० |

स्त्रोत: जनगणना संचालनालय, भारत सरकार, २०११

तक्ता क्र. ३ मध्ये देशातील साक्षरता प्रमाणाचा अभ्यास करण्यात आला आहे. सन २००१ मध्ये भारताच्या साक्षरतेचे प्रमाण ६४.८४ टक्के होते त्यामध्ये सन २०११ मध्ये ७०.०४ टक्के एवढी वाढ झाली आहे.भारताच्या साक्षरता प्रमाणात २००१ च्या तुलनेत जवळपास ५ टक्के पेक्षा जास्त वाढ झाली आहे. भारतातील केरळ, मिझोराम या राज्यांचे साक्षरता प्रमाण २००१ मध्ये देशातील सर्वाधिक ९०.८६ आणि ८८.८० टक्के होते, ते प्रमाण २०११ मध्ये वाढुन अनुक्रमे ९३.९० व ९१.६० टक्के एवढे वाढले आहे. सन २०११ मध्ये देखील केरळ आणि मिझोराम राज्य साक्षरतेमध्ये प्रथम होते.देशात सर्वात कमी साक्षरता

असणारी राज्ये बिहार आणि झारखंड ही होती, ज्यांचे साक्षरता प्रमाण २००१ मध्ये केवळ ४७.०० व ५३.५६ टक्के एवढे होते त्यामध्ये सन २०११ मध्ये अनुक्रमे ६३.०० आणि ६७.०० टक्के एवढी वाढ झाली सन २०११ मध्ये बिहार आणि झारखंड राज्याच्या साक्षरतेत वाढ झाली असेल तरीही इतर राज्यांच्या तुलनेत कमी साक्षर असल्याचे दिसून येते.

महाराष्ट्र राज्यामध्ये साक्षरता प्रमाण सन २००१ मध्ये ७६.८८ टक्के होते ते सन २००१ च्या सरासरी पेक्षा जास्त होते. त्यामध्ये सन २०११ मध्ये ८२.९० टक्के एवढी वाढ झाली आहे.सन २०११ मध्ये देखील महाराष्ट्र राज्य भारताच्या सरासरी दरापेक्षा जास्त साक्षर आहे. देशातील साक्षरतेमध्ये मोठ्या प्रमाणात राज्यनिहाय तफावत आहे. आणि याचबरोबर स्त्री-पुरुष साक्षरतेमध्येही तफावत जाणवते.

सन २०११ मध्ये स्त्री-पुरुष साक्षरता प्रमाणामध्ये बिहार आणि झारखंड राज्यांमध्ये तफावत दिसून येते. सन २००१ मध्ये पुरुषांचे साक्षरता प्रमाण ५९.८८ आणि ६७.३० टक्के होते तेंव्हा त्याच राज्यांचे महिला साक्षरता प्रमाण ३३.१२ आणि ३८.८७ टक्के होते ही तफावत सन २०११ मध्ये देखील कायम होती. बिहार आणि झारखंड राज्याची पुरुष साक्षरता सन २०११ मध्ये ७३.५० आणि ७३.०९ असतांना महिला साक्षरता केवळ ५३.३० आणि ५९.०६ टक्के होती. म्हणजेच पुरुष आणि महिला साक्षरतेच्या प्रमाणात तफावत असल्याचे दिसून येते. महाराष्ट्रासारख्या प्रगत साक्षरता प्रमाण ८५.९७ टक्के होते तर महिला साक्षरता प्रमाण केवळ ६७.०३ होते त्याचप्रमाणे २०११ मध्ये पुरुष साक्षरता प्रमाण ८९.८० होते तर महिला साक्षरता प्रमाण केवळ ७५.५० टक्के होते. म्हणजेच स्त्री-पुरुष साक्षरता प्रमाणात महाराष्ट्र राज्यामध्ये देखील तफावत जाणवते.

**निष्कर्ष:-**

१. सन २००१ च्या तुलनेत भारताचे स्त्री-पुरुष प्रमाण सन २०११ मध्ये वाढलेले दिसून येते.
२. भारतातील चंदीगड, दीव दमण आणि दादर नगर हवेली या राज्याचे स्त्री-पुरुष प्रमाण २००१ मध्ये अनुक्रमे ७७७, ७१०, ८१२ एवढे होते. त्यामध्ये २०११ मध्ये अनुक्रमे ८१८, ६१८ व ७७५ एवढी घट झालेली आहे. म्हणजेच ही राज्ये स्त्री-पुरुष प्रमाणामध्ये सरासरीपेक्षा खुपच खालावलेली आहेत.
३. सन २००१ मध्ये महाराष्ट्राचे स्त्री-पुरुष प्रमाण ९१२ होते. त्यामध्ये सम२०११ मध्ये ९२५ एवढी वाढ झाली परंतु महाराष्ट्रासारखे पुरोगामी राज्यदेखील सरासरीपेक्षा खुपच मागे आहे.
४. ० ते ६ वयाोगटातील मुला-मुलींचे प्रमाण २००१ मध्ये ९२७ होते त्यामध्ये २०११ मध्ये ९१४ एवढी घट झालेली आहे. ही निश्चितच भयावह स्थिती दिसून येते.
५. महाराष्ट्र, छत्तीसगड, हरियाणा आदी राज्यांचा विचार करता २००१च्या तुलनेत ० ते ६ वयोगटातील मुला-मुलींच्या प्रमाणात मोठ्या प्रमाणात घट झालेली आहे.
६. भारताचे साक्षरता प्रमाण ६४.८४ टक्के होते, त्यामध्ये २०११ मध्ये ७०.०४ एवढी वाढ झालेली आहे.देशातील साक्षरतेच्या सरासरीचा विचार केला असता केरळ, मिझोराम या राज्यांचे साक्षरता प्रमाण सर्वाधिक आहे तर बिहार व झारखंड या राज्यांचे साक्षरता प्रमाण अत्यंत कमी आहे.
७. महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्याचा अभ्यास करता असे दिसून येते की, सन २०११ मध्ये पुरुष साक्षरता प्रमाण ८९.८० टक्के तर महिला साक्षरता प्रमाण ७५.५० टक्के होते म्हणजेच महाराष्ट्रातदेखील स्त्री-पुरुष साक्षरतेच्या प्रमाणात असमतोल दिसून येतो.

**शिफारशी:-**

१. भारतातील स्त्री-पुरुष प्रमाणाचा आढावा घेताना राज्यनिहाय स्त्री-पुरुष लिंग गुणोत्तरामध्ये तफावत आढळून आली आहे.म्हणूनच ही तफावत कमी करण्यासाठी समाजात स्त्रियांचे महत्व पटवून देणे व हे करण्यासाठी पुरुषांच्या मानसिकतेत बदल, प्रबोधन, जनजागरण व शैक्षणिक साधनाद्वारे बदल करणे अपरिहार्य ठरते.
२. भारतात लिंग गुणोत्तरामध्ये २००१ च्या तुलनेत वाढ झाली आहे. मात्र लिंग गुणोत्तरात प्रगती होणे आवश्यक आहे.
३. लिंग गुणोत्तरामध्ये राज्या-राज्यांमध्ये मोठी असमानता जाणवते ती कमी करणे आवश्यक आहे.
४. लिंग-गुणोत्तरातील तफावत कमी करण्यासाठी साक्षरतेमध्ये आरोग्य सुविधेमध्ये वाढ करणे आवश्यक आहे.
५. स्त्री-पुरुष साक्षरतेतील तफावत कमी करण्यासाठी शिक्षण हक्क कायद्याची अंमलबजावणी होणे आवश्यक आहे.
६. शिक्षणामध्ये मुलींसाठी शिष्यवृत्ती योजना, दत्तक योजना राबवणे आवश्यक आहे.
७. लिंगनिदान चाचण्या करणाऱ्या केंद्रावर शासकिय नियंत्रण आवश्यक आहे.

**संदर्भ:-**

१. कुरुक्षेत्र, जुलै २०१२ ग्रामीण जीवणाचे बदलते स्वरुप, ग्रामीण विकास मंत्रालय, नवी दिल्ली.
२. लोकराज्य, सप्टेबर २०११माहिती जनसंपर्क संचालनालय , मुंबई.
३. सामाजिक संशोधन पध्दती, प्रथम आवृत्ती २००८-०९, आलोनी व बोधनकर, मुंबई.
४. महाराष्ट्राचा आर्थिक विकास- एक चिंतन, २०१२- डॉ. बी. आर. गायकवाड, चिन्मय प्रकाशन औरंगाबाद.
5. www.Indiastat.com
6. www.cencesIndia2011.com